**पंतप्रधान मोदी यांची जॉर्डन, इथिओपिया व ओमानला भेट (डिसेंबर 15 - 18, 2025)**

11 डिसेंबर 2025

जॉर्डनचे राजा अब्दुल्ला द्वितीय बिन अल हुसैन यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी डिसेंबर 15 - 16, 2025 रोजी जॉर्डनच्या राज्याचा दौरा करतील. या भेटीदरम्यान पंतप्रधान राजा अब्दुल्ला द्वितीय बिन अल हुसैन यांची भेट घेऊन भारत व जॉर्डन यांच्यामधील संबंधांचा आढावा घेतील, आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा करतील. हा दौरा दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांना 75 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने होत आहे, जो, भारत-जॉर्डन यांच्यामधील द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्याची संधी देईल, परस्पर विकास व समृद्धीसाठी सहयोगाचे नवे मार्ग शोधण्याची संधी देईल, आणि प्रादेशिक शांती, समृद्धी, सुरक्षा व स्थैर्य यांच्यासाठी आपली वचनबद्धता पुन्हा स्पष्ट करेल.

2. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात इथिओपियाचे पंतप्रधान माननीय डॉ. अबिय अहमद अली यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान डिसेंबर 16 - 17, 2025 रोजी इथिओपियाला औपचारिक भेट देतील. ही पंतप्रधान मोदी यांची इथिओपियाची पहिली भेट असेल. ते डॉ. अबिय अहमद अली यांच्याशी भारत-इथिओपिया द्विपक्षीय संबंधांच्या सर्व आयामांवर व्यापक चर्चा करतील. जगाच्या दक्षिणेतील भागीदार असल्याने, हा दौरा दृढ मित्रता व द्विपक्षीय सहकार्य यांबाबतच्या सामायिक वचनबद्धतेचा पुनरुच्चार करेल.

3. आपल्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात, पंतप्रधान, ओमानचे सुल्तान हैथम बिन तारिक यांच्या निमंत्रणावरून 17 - 18 डिसेंबर 2025 रोजी ओमानला भेट देतील. पंतप्रधान मोदी यांची ही ओमानची दुसरी भेट असेल. भारत व ओमानच्या दरम्यान एक व्यापक धोरणात्मक भागीदारी आहे जी, शेकडो वर्षांच्या जुन्या मैत्रीवर, व्यापारी संबंधांवर व मजबूत मानवी संपर्कांवर आधारलेली आहे. दोन्ही देशांच्या राजनैतिक संबंधांना 70 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा दौरा होत आहे, आणि डिसेंबर 2023 मध्ये ओमानच्या सुल्ताननी भारताला दिलेल्या औपचारिक भेटीनंतर हा दौरा होत आहे. या भेटीमुळे उभय बाजूंनी द्विपक्षीय भागीदारीचा व्यापक आढावा घेण्याची संधी मिळेल, ज्यात व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, संरक्षण, तंत्रज्ञान, कृषी व संस्कृती यांचा समावेश असेल तसेच यावेळी परस्पर हिताच्या प्रादेशिक व जागतिक बाबींवरही चर्चा होईल.

नवी दिल्ली

11 डिसेंबर 2025